


दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे | अंक : २९८ वा | बुधवार दि ११ फेब्रुवारी २०२६ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# ठाकरेंची साथ, भाजपची सायलेंट सत्ताखेळी; सर्वाधिक जागा मिळवूनही काँग्रेस सत्तेबाहेर कसं?

वृत्तसंस्था/ चंद्रपूर

भाजपचे ज्येष्ठ नेते आणि आमदार सुधीर मुनगंटीवार, तसेच आमदार किशोर जोरगेवार शांतपणे शिवसेना (उबाठा) शी वाटाघाटी करत असतानाच काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार आणि खासदार प्रतिभा धानोरकर यांच्यातील वाद मिटवण्यात व्यस्त होते. अंतर्गत कलहामुळे काँग्रेसचे २७ नगरसेवक शेवटपर्यंत एकत्र येऊ शकले नाहीत. काँग्रेसमधील याच अंतर्गत वादाचा फायदा भाजपने घेतला. या घडामोडीतच भाजपने ङ्गसायलेंटफ खेळी करून बाजी मारत चंद्रपूर महापालिकेत सत्ता स्थापन केली. चंद्रपूर महापालिका निवडणुकीत काँग्रेस सर्वाधिक २७ जागा जिंकत सर्वात मोठा पक्ष म्हणून समोर आला. सत्तास्थापनेसाठी हालचाली वाढल्या असतानाच काँग्रेसचे विधिमंडळातील पक्षनेते विजय वडेट्टीवार आणि खासदार प्रतिभा धानोरकर यांच्यातील वाद वाढला. महापौरपदासाठी पक्षातून आपल्याच गटाला उमेदवारी मिळावी म्हणून दोन्ही नेते अडून बसले. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या मध्यस्थीनंतरही हा वाद संपत नसल्याचे दिसताच दिल्ली दरबारी जाऊन चर्चा करण्यात आली. दोन दिवसांच्या चर्चेनंतर महापौरपद धानोरकर गटाला तर उपमहापौरपद वडेट्टीवार गटाच्या नगरसेवकाला देण्याचे निश्चित करण्यात आले. मात्र महापौरपदासाठी चार अर्ज दाखल झाल्याने नेमक्या नावावर निवडणुकीच्या आदल्या दिवशीपर्यंत एकमत होऊ शकले नव्हते. तिकडे शिवसेना (उबाठा) महापौरपदावर कायम असल्याने सोमवारी वडेट्टीवार आणि केदार यांच्यात नागपुरात आघाडीच्या अनुषंगाने बैठक झाली. काँग्रेसचा महापौर होणार असे काँग्रेस विधिमंडळातील पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी स्पष्ट केले. शिवसेना (उबाठा)ही महापौरपद देणाऱ्यालाच पाठिंबा देणार असल्याचे सांगत असल्याने पेच निर्माण झाला होता. मंगळवारी सकाळी वडेट्टीवार आणि शिवसेना (उबाठा)चे जिल्हाप्रमुख संदीप गिऱ्हे यांची बैठक झाली. या बैठकीत शिवसेना (उबाठा)ने महापौरपदाची मागणी केली, मात्र काँग्रेसकडून त्यास नकार मिळाल्याने बैठक निष्फळ ठरली. नाराज झालेले गिऱ्हे बैठकीतून बाहेर पडले. त्यानंतर काही वेळातच भाजपला पाठिंबा देण्याची घोषणा करण्यात आली. भाजपकडून महापौरपद देण्याची कबुली मिळाल्याने वेगळा निर्णय घेतल्याचे त्यांनी स्पष्ट केले. काँग्रेसमध्ये हे घडत असताना भाजपचे आमदार सुधीर मुनगंटीवार आणि किशोर जोरगेवार यांनी वादावर पडदा टाकत मुख्यमंत्र्यांच्या निर्देशावरून काम सुरू केले. ङ्गपाठिंबा देणाऱ्या



पक्षांशी चर्चा अंतिम टप्प्यात आहे. चर्चा पूर्ण झाली की लेखी स्वरूपात करार होणार असून भाजपचाच महापौर होणारफ, असे मुनगंटीवार यांनी दोन दिवसांपूर्वीच जाहीर केले होते. महापालिकेतील निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीचे नगरसेवक गैरहजर राहिले. यानंतर वंचित बहुजन आघाडीच्या चंद्रपूर शहराध्यक्ष स्नेहल रामटेके यांच्या अध्यक्षतेखालील कार्यकारिणी बरखास्त करण्यात आली आहे. याबाबतचे पत्र वंचित बहुजन आघाडीचे प्रदेश महासचिव किसन चव्हाण यांनी दिले आहे.

# भ्रष्टाचाराविरुद्ध दिव्यांग बांधवांचा अन्नत्याग प्रहार दिव्यांग क्रांती आंदोलन आक्रमक

जनसंचलन/बुलढाणा

दिव्यांग बांधवांच्या विविध प्रलंबित मागण्यांसह जिल्हा सामान्य रुग्णालयातील कारभाराविरोधात प्रहार दिव्यांग क्रांती आंदोलन संघटना चांगलीच आक्रमक झाली आहे. वारंवार निवेदन देऊनही प्रशासनाने दखल न घेतल्याने आज १० फ ेब्रुवारी २०२६ पासून दिव्यांग बांधवांनी जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयासमोर बेमुदत अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे. प्रहार दिव्यांग क्रांती आंदोलनाच्या वतीने जिल्हा शल्य चिकित्सकांना विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले होते.मात्र संबंधितांनी केले दुर्लक्ष यामुळे संघटनेच्या वतीने स्मरणपत्र देण्यात येऊन रुग्णालयातील काही डॉक्टर आणि दलाल

**दिव्यांग/ अस्तिव्यंग तपासणी विभागातील वर्षनवर्षं डेपोटेशनवर कुंडली मारून बसलेल्या अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना त्वरीत तेथून काढा अन्यथा १ मार्चला आंदोलन चिघळणार**

/ एजंट संगनमत करून पैसे घेऊन बोगस दिव्यांग प्रमाणपत्रे वाटप करत असल्याचा खळबळजनक आरोप करत सखोल चौकशी करण्यात यावी, दिव्यांग तपासणी कक्षात पारदर्शकता राहावी,यासाठी तेथे इन कॅमेरा तपासणी करण्यात यावी, कक्षात सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात यावेत. चालता न येणाऱ्या दिव्यांग बांधवांसाठी पुरेशा व्हीलचेअरची व्यवस्था करण्यात यावी. गेल्या ५ ते १० वर्षांपासून दिव्यांग बोर्डावर ठाण मांडून बसलेल्या त्या कर्मचाऱ्यांची व डॉक्टरांची तत्काळ अदलाबदल करण्यात यावी,नवीन प्रमाणपत्रांसाठीचे ऑनलाईन अर्ज रुग्णालयातूनच मोफत भरून देण्यात यावेत, अशी मागणी करण्यात आली होती. मात्र, प्रशासनाने याकडे साफ दुर्लक्ष केल्याने दिव्यांग बांधवांमध्ये मोठा असंतोष निर्माण झाला असून त्यांनी आज १० फेब्रुवारीपासून अन्नत्याग आंदोलनास प्रारंभ केला आहे. प्रहार अपंग क्रांती आंदोलनाचे जिल्हा उपाध्यक्ष राजेश पुरी यांच्या नेतृत्वात मुकेश राजपूत, सुरेश सुरोशे, सुरज जंजाळ, महेंद्र मेढे,




मोहम्मद निसार मोहम्मद इकबाल, भगवान लेणीकर, श्रीरंग सुरशे, आरिफ खान, जाफर हुसेन, सय्यद जाफर यांच्यासह अनेक दिव्यांग बांधव उपोषणात सहभागी झाले आहेत.

# ही जबाबदारी कोणाची?



मुंबई-पुणे दृतगती महामार्गावर मंगळवारी संध्याकाळी उलटलेला प्रोपेलीन वायूने भरलेला टँकर ही एक दुर्घटना होती. त्या दुर्घटनेनंतर ३५ तास जे काही घडले, तो मात्र केवळ अपघात नव्हता, तर ती प्रशासकीय अपयशाची साखळी होती. हजारो प्रवासी अन्न-पाण्याविना, प्रसाधनाच्या मूलभूत सुविधांशिवाय महामार्गावर अडकलेले असताना, राज्याच्या यंत्रणांनी दाखवलेली उदासीनता ही केवळ धक्कादायकच नाही, तर विचार करायला भाग पाडणारी आहे. टँकर उलटल्यानंतर वायूगळती सुरू झाली, ही बाब अतिशय गंभीर होती. महामार्ग पोलिसांनी तातडीने खबरदारीचा उपाय म्हणून वाहतूक थांबवली, हे योग्यच होते; परंतु प्रश्नही येथूनच सुरू होतो - खबरदारी घेतली; पण माणसांची जबाबदारी कुणी घेतली? वायूगळती थांबवण्यासाठी केंद्रीय यंत्रणा, पेट्रोलियम कंपन्या, तांत्रिक तज्ज्ञ घटनास्थळी दाखल झाले. त्याच वेळी अडकलेल्या हजारो प्रवाशांची सुटका कशी करायची, त्यांना अन्न, पाणी, वैद्यकीय मदत, किमान माहिती तरी कशी द्यायची, याचा विचार करण्यासाठी राज्याच्या प्रशासकीय यंत्रणेत कुठेही हालचाल दिसली नाही. खरे तर अशा वेळेस सरसकटपणे लोकप्रतिनिधी किंवा मंत्र्यांना जबाबदार धरण्याची पद्धत आहे. गळती आणि कोंडीच्या घटनेच्या वेळेस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस राज्याबाहेर होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व आपत्कालीन मदत विभाग सांभाळणारे गिरीश महाजन मुंबईबाहेर होते. इतर मंत्रीही आपापल्या मतदारसंघांमध्ये गेले होते. त्यातच जिल्हा परिषद निवडणुकीच्या प्रचाराचा शेवटचा दिवस असल्याने सगळ्या नेत्यांचे लक्ष त्यामध्ये होते. अर्थात, या घटनेकडे गांभीर्याने का बघितले नाही, याचे हे समर्थन किंवा सबब होऊ शकत नाही; कारण अशा परिस्थितीत सापडलेल्या हजारो नागरिकांचे उत्तरदायित्व लोकप्रतिनिधी म्हणून त्यांनाच घ्यावे लागणार आहे. या सगळ्या लोकप्रतिनिधींबरोबर सरकारचा प्रमुख स्तंभ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रशासकीय सेवेतील अधिकारी नक्की काय करत होते, हा प्रश्न उरतोच. राज्याच्या प्रशासनामध्ये मुख्य सचिवांपासून, अतिरिक्त मुख्यसचिव, प्रधान सचिव, सचिव, आयुक्त, संचालक अशी उतरंड असते. प्रत्येक विभागामध्ये असे अधिकारी कार्यरत असतात. महाराष्ट्रासारख्या पुढारलेल्या राज्यामध्ये अशा विभागांचे सचिवपद मिळण्यासाठी भारतीय प्रशासकीय सेवेमध्ये किमान पंधरा ते वीस वर्षांची सेवा करावी लागते. मुख्य सचिवांपर्यंत जाण्यासाठी तर पस्तीस वर्षे लागतात. साहजिकच, या सगळ्यांना सरकार नावाची यंत्रणा कशी चालवायची, याचे पुरेसे भान असते. कालच्या घटनेत हे प्रशासकीय शहाणपण नक्की कोठे गेले होते, हा खरा प्रश्न आहे. त्याचे उत्तर देण्यासाठी किंवा आपण कर्तव्यामध्ये कमी पडलो म्हणून दिलगिरी व्यक्त करण्यासाठी, या सर्व घटनेची जबाबदारी घेणे आवश्यक आहे. दुर्दैवाने ही घटना घडून तीन-चार दिवस झाले, तरीही प्रशासनामधील कोणीही जबाबदारी घेण्यास तयार नाही. एकदा वाहतूक कोंडी झाली, की ती फक्त वाहनांची नसते; ती माणसांच्या संयमाची, त्यांच्या सहनशक्तीची कोंडी असते. मंगळवारची संपूर्ण रात्र हजारो लोकांनी महामार्गावर घालवली. कोणी वृद्ध होते, कोणी लहान मुलांसह प्रवास करीत होते, कोणी आजारी होते. या सगळ्यांची नोंद कुठेही घेतली गेली नाही. धक्कादायक बाब म्हणजे, टँकर घटनास्थळावरून हटवून तब्बल ४८ तास उलटल्यानंतरही एखाद्या उच्चपदस्थ अधिकाऱ्याने घटनास्थळी भेट दिल्याची माहिती नाही. गृह विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ या सगळ्या यंत्रणांपैकी एकाही विभागाने सचिव स्तरावर बसून नेमके चुकले कुठे? असा प्रश्न विचारल्याचे दिसत नाही. मंत्रालयातील सूत्रे सांगतात, की या घटनेची कारणमीमांसा करण्यासाठी किंवा भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी कुठलीही बैठकच झाली नाही. या अपघाताचा घटनाक्रम बघितल्यास ही निर्नायकी अवस्था ठळकपणे पुढे येते. अपघात संध्याकाळी पाच वाजण्याच्या सुमारास झाला. त्या टँकरमध्ये अतिज्वलनशील वायू असल्याचे त्यावर स्पष्टपणे लिहिलेले होते. पण अशा प्रसंगी नक्की कोणाशी संपर्क साधायचा, या विषयातील तज्ज्ञ नक्की कोठे उपलब्ध होतील, याची माहितीच कोणाला नव्हती. त्यामुळे संबंधितांशी संपर्क साधण्यास या यंत्रणेला तब्बल दहा तासांहून अधिक वेळ लागला. संबंधित तज्ज्ञ जागेवर येऊन पाहणी केल्यानंतर, या टँकरमधील वायू दुसऱ्या टँकरमध्ये हलविण्याशिवाय पर्याय नसल्याचे लक्षात आले. त्यानंतर तशाच मोकळ्या टँकरचा शोध संपून रिकामा टँकर घटनास्थळापर्यंत पोहोचेपर्यंत मूळ घटना घडल्याला सुमारे अठरा-वीस तास होऊन गेले होते. त्यात कोठेही ठिणगी पडू नये, यासाठी सतर्क राहणे तितकेच गरजेचे होते. हा टँकर एका बोगद्याच्या टोकाशी बंद पडल्यामुळे, बोगद्याच्या पलीकडच्या टोकापर्यंतचा टापू धोकादायक बनला होता. या परिस्थितीचे आकलन करून घेऊन जागेवर निर्णय घेणारा, उच्चपदस्थांशी बोलू शकणारा व विविध यंत्रणा कामाला लावू शकणारा एकही अधिकारी किंवा लोकप्रतिनिधी जागेवर नव्हता. हा प्रश्न केवळ एखाद्या अपघातापुरता मर्यादित नाही. आपली आपत्कालीन प्रतिसाद व्यवस्था नेमकी कशी आहे? कोणता विभाग पुढाकार घेणार, कोण समन्वय साधणार, कोण निर्णय घेणार या सगळ्यांची स्पष्ट आखणी आहे का? की प्रत्येक विभाग आपापल्या फाइलमध्ये अडकून बसतो आणि माणसे मैदानात अडकून पडतात? महामार्ग पोलिसांनी मुंबईकडे जाणारी वाहतूक अन्यत्र वळवण्याचा निर्णय मंगळवारी रात्री घेतला; पण तोपर्यंत कोंडीत अडकलेल्यांसाठी तातडीचा दिलासा देण्याची गरज होती. गुरुवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घटनेचा आढावा घेताना, विभागांमधील समन्वयाच्या अभावावर तीव्र नाराजी व्यक्त केली. अशा घटनांमध्ये विविध विभागांनी कसा समन्वय साधावा, यासाठी मार्गदर्शक प्रणाली तयार करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. हे स्वागतार्ह आहे; पण प्रश्न असा आहे, की घटना घडून गेल्यानंतर दिलेल्या सूचनांपेक्षा, घटना घडत असताना घेतलेले निर्णय अधिक महत्त्वाचे नसतात का? आज राज्यात द्रुतगती महामार्ग, समृद्धी महामार्ग, मोठे औद्योगिक प्रकल्प यांची चर्चा होते. विकासाची भाषा बोलली जाते; पण अशा एका संकटाच्या वेळी प्रशासनाला ३५ तासांत प्रवाशांपर्यंत पोहोचता येत नसेल, तर त्या विकासाची परीक्षा कुठे होते? आपत्ती व्यवस्थापन ही फक्त पूर, भूकंप, चक्रीवादळ यांपुरते मर्यादित नाही. महामार्गावरची वाहतूक कोंडी आपत्तीच असते; कारण ती माणसांच्या मूलभूत गरजांवर परिणाम करते.






The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# विदर्भात ऐतिहासिक गुंतवणूक, तीन दिवसांत तब्बल ४५ हजार कोटींचे करार; गडकरींची माहिती



**नागपूर :** 'विदर्भामध्ये १० हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या, अडीच हजार मुलांचा कुपोषणामुळे मृत्यू झाला. ही परिस्थिती बदलविण्याच्या ध्येय्यातून विदर्भाच्या परिवर्तनाचा हा प्रवास सुरू झाला आहे. माओवादाची राजधानी म्हटल्या जाणारे गडचिरोली आज स्टील हब म्हणून उदयास येत आहे. तब्बल ७.५ लाख कोटींची गुंतवणूक तिथे होत आहे. वाघ्र पर्यटन वाढले आहे. वाघांची संख्या इतकी झाली आहे की, येथील वाघ दुसऱ्या राज्यांमध्ये पाठवावे लागत आहे', अशी माहिती केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिली.

आजपासून पाच वर्षांपूर्वी गडचिरोलीतील मुले ऑस्ट्रेलियामध्ये शिकायला जाणार आहेत, असे कुणी सांगितले असते तर मी हसलो असतो. मात्र, आज हा बदल दिसून येतोय. येत्या तीन वर्षांमध्ये नागपूरातील घराघरात पाइपलाइनद्वारे गॅसचा पुरवठा होणार आहे. मिहानचा विस्तार करण्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंजुरी दिली आहे. त्यानुसार अतिरिक्त १० हजार एकर जागेत मिहानचा विस्तार होणार आहे. ॲडव्हांटेज विदर्भाचे व्यासपीठ हे राजकीय नसून विदर्भाच्या विकासाचा दृष्टीकोन मांडणाऱ्यांचे आहे, त्यातूनच विदर्भाचे चित्र बदलत आहे', असं नितीन गडकरी म्हणाले.असोसिएशन फॉर इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंटद्वारे (एआयडी) आयोजित ॲडव्हांटेज विदर्भ-खासदार औद्योगिक महोत्सवाचा समारोपीय सोहळ्यामध्ये केंद्रीय मंत्री नितीन गडकरी बोलत होते. व्यासपीठावर केंद्रीय एमएसएमई राज्यमंत्री शोभा करंदलाजे, राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, आमदार डॉ. आशिष देशमुख, नीती आयोगाचे सदस्य पद्मविभूषण डॉ. व्ही. के. सारस्वत, महापौर नीता ठाकरे, उपम हापौर लीला हाथीबेड, महापालिका सत्तापक्ष नेते बाल्या बोरकर, माजी मंत्री सुलेखा कुंभारे आदींची उपस्थिती होती. प्रास्ताविकपर भाषणात एआयडीचे अध्यक्ष आशिष काळे मागील तीन दिवसांमध्ये २२ विद्यार्थ्यांच्या पेटेंट्सला साडेपाच कोटींचे फंडिंग झाल्याचे सांगितले. सूत्रसंचालन आसावरी गलांडे यांनी केले. आभार एआयडीचे सचिव डॉ. विजय शर्मा यांनी मानले.कृषीनंतर सर्वाधिक रोजगार देणारे क्षेत्र हे एमएसएमई आहे. देशाच्या दरडोई उत्पन्नात ३१ टक्के तर निर्यातीमध्ये ४५ टक्के योगदान एमएसएमईचे आहे. ७.५ कोटी एमएसएमईच्या माध्यमातून ३३ कोटी रोजगार निर्मिती झाली आहे, अशी माहिती केंद्रीय एमएसएमई राज्यमंत्री शोभा करंदलाजे यांनी दिली. तसेच भारतीय उद्योजकांनी निर्यातक्षम उत्पादन करत जागतिक स्पर्धेत स्वत:चे अस्तित्व निर्माण करायला हवे, असे आवाहन केले.समारोपीय कार्यक्रमादरम्यान एड-टेक क्षेत्रात लर्न कोच आणि असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट अंतर्गत लर्निंग स्कूल ऑफ टेक्नॉलॉजी यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. सुनील फेरो अँड इंजिनीअरिंग प्रायव्हेट लिमिटेड विदर्भात ५ हजार कोटींची गुंतवणूक करणार असून या माध्यमातून सुमारे १,५०० प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगारनिर्मिती होणार आहे, अशी माहिती देण्यात आली. तसेच आरोह हॉस्पिटॅलिटी आणि महिंद्रा सिग्नेचर यांच्यात ताडोबा आणि पेंच येथे पंचतारांकीत रिसॉर्ट उभारणीसाठी सामंजस्य करार झाला. एनएम आरडीएसोबत १,२०० कोटींची गुंतवणूक करणार असल्याबद्दल व्हीआयपीएलचे प्रशांत उगेमुगे यांचा सत्कार करण्यात आला.

## त्रिवेणी संगमावर दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादांच्या अस्थींचे विसर्जन



**प्रयागराज :** महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजित पवार यांच्या अस्थींचे आज उत्तरप्रदेशातील पावन प्रयागराज येथे गंगा, यमुना आणि सरस्वती यांच्या त्रिवेणी संगमावर विधीवत विसर्जन करण्यात आले. अत्यंत साध्या पण भावपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या विधीवेळी पवार कुटुंबिय आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते.अजितदादांच्या निधनानंतर राष्ट्रवादी परिवारातर्फे काश्मीर ते कन्याकुमारी अशी देशव्यापी 'अस्थि-कलश यात्रा' काढण्यात आली होती.

हरिद्वार येथून सुरू झालेल्या या राष्ट्रव्यापी यात्रेची सांगता आज प्रयागराजमध्ये झाली. या यात्रेच्या माध्यमातून देशाच्या विविध भागांतील नागरिकांनी लाडक्या नेत्याला आदरांजली वाहिली.अजितदादांचे चिरंजीव, युवानेते जय पवार यांनी याप्रसंगी उपस्थित राहून पुत्राचे कर्तव्य पार पाडले. त्रिवेणी संगमाच्या व्हीआयपी घाटावर पुरोहितांच्या मार्गदर्शनाखाली अस्थि-कलशाचे विधिवत पूजन करण्यात आले. त्यानंतर अत्यंत भावूक वातावरणात जय पवार यांनी पवित्र अस्थी संगमाच्या प्रवाहामध्ये अर्पण केल्या. आपल्या लाडक्या नेत्याला अखेरचा निरोप देताना उपस्थित कार्यकर्त्यांचे डोळे पाणावले होते.हा सोहळा राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष धीरज शर्मा यांच्या नेतृत्वाखाली पार पडला. यावेळी राष्ट्रीय सचिव धनंजय शर्मा, उत्तरप्रदेश राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हरिश्चंद्र सिंग, तसेच उत्तरप्रदेशातील भाजपचे काही प्रमुख नेते आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते.संगम घाटावर उपस्थित असलेल्या स्थानिक नागरिकांनीही अजितदादांच्या आठवणींना उजाळा देत त्यांच्याबद्दलचा आदर व्यक्त केला. या विसर्जनासह अजितदादांच्या अस्थि-कलश यात्रेचा हा प्रवास आज पवित्र संगमाच्या तीरावर शांत झाला.

## अमेरिकेसोबत करार होताच पाठ फिरवली

**मुंबई :** भारत-अमेरिकेतील अंतरिम व्यापार करारानंतर भारतीय रिफायनर्स रशियन तेलाची आयात कमी करण्याची शक्यता आहे. गेल्या काही महिन्यांपासून रशियन तेल खरेदीच्या मुद्द्यावरून रखडलेला भारत-अमेरिका व्यापार करार काही महत्त्वाच्या अटी आणि शर्तीवर करण्यात आला आहे. अशा स्थितीत, निर्णय कराराच्या अटी पूर्ण करण्यासाठी रिफायनर्स त्यांच्या विद्यमान ऑर्डर पूर्ण झाल्यानंतर नवीन ऑर्डर देणार नसल्याचे पीटीआयने आपल्या अहवालात म्हटले आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अलीकडेच भारतीय वस्तूंवरील टॅरिफ ५० टक्क्यांवरून १८% पर्यंत कमी करायची घोषणा केली आणि त्या बदल्यात भारत रशियन तेल खरेदी करणे थांबवेल असा दावा केला. गेल्या वर्षी ऑगस्ट २०२५ मध्ये अमेरिकेने रशियन तेल खरेदी केल्याबद्दल 'दंड' म्हणून भारतावर अतिरिक्त २५% कर लादला होता, पण दोन्ही देशांमधील व्यापार करारानंतर आता वरील शुल्क पूर्णपणे हटवले आहे.अमेरिकेसोबत ट्रेड डीलची घोषणा होताच भारतीय रिफायनर्स रशियन तेल खरेदीवर पाठ फिरवत आहेत.

## 'राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाचा निर्णय घ्यायला शरद पवार सक्षम'




**अहिल्यानगर :** राष्ट्रवादी बाबत निर्णय घेण्यासाठी शरद पवार सक्षम आहेत, असं उदय सामंत यांनी म्हटलं आहे. राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाच्या चर्चेवर उदय सामंत यांनी ही प्रतिक्रिया दिली आहे. दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या संभाव्य विलिनीकरणावरून सुरू असलेल्या चर्चांना आता नवे वळण मिळाले असून, या साऱ्या घडामोडींवर उद्योग मंत्री तथा शिवसेनेचे नेते उदय सामंत यांनी स्पष्ट आणि ठाम भूमिका मांडली आहे. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार की नाही, हा पूर्णपणे त्यांचा अंतर्गत पक्षाचा विषय असला तरी या निर्णयासाठी शरद पवार साहेब पूर्णपणे सक्षम आहेत, असे ठाम मत सामंत यांनी व्यक्त केले.सामंत म्हणाले की, जयंत पाटील यांनी जे काही वक्तव्य केलं आहे, ते त्यांचं वैयक्तिक मत होतं. मात्र अंतिम निर्णय घेण्याची ताकद, अनुभव आणि अधिकार हे शरद पवार साहेबांकडेच आहेत. त्यामुळे राष्ट्रवादीबाबतचा निर्णय त्यांच्याच नेतृत्वाखाली होईल. या वक्तव्यामुळे राष्ट्रवादीच्या भवितव्याबाबत सुरू असलेल्या दाव्या-प्रतिदाव्यांवर पडदा पडेल, अशी राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे. जिल्हा परिषद निवडणुकांबाबतही उदय सामंत यांनी आत्मविश्वास व्यक्त करत विरोधकांना इशारा दिला. ते म्हणाले, 'महायुतीमध्ये भाजपा हा मोठा पक्ष आहे, हे मान्य आहे. पण आम्ही भाजपाच्या अगदी पाठोपाठ आहोत. थेट दुसऱ्या क्रमांकावर आहोत, असंही यावेळी सामंत म्हणाले. दरम्यान, गेल्या तीन वर्षांतील शिवसेनेची कामगिरी सांगताना सामंत यांनी आकडेवारी मांडली. ६० आमदार निवडून येणं, ७२ नगरपालिकांमध्ये अध्यक्षपद मिळवणं, ४५० पेक्षा अधिक नगरसेवक निवडून येणं ही आमची ताकद आहे. जिल्हा परिषद निवडणुकांमध्येही शिवसेनेचा स्ट्राईक रेट नक्कीच चांगला राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. राज्यात सत्तासमीकरणे बदलत असताना आणि आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तोंडावर असताना, उदय सामंत यांच्या या विधानांनी चर्चांना पुन्हा एकदा उधाण आणले आहे.

# 'सव्वा कोटी हिंदू लढण्यासाठी उभे राहिले तर..'



**मुंबई :** बांगलादेशात हिंदूंवर वारंवार हल्ले केले जात आहेत. गेल्या सहा महिन्यांपासून बांगलादेशातील हिंदू समाजाचे नागरिक प्रचंड दहशतीत जगत आहेत. अनेक हिंदू नागरीक, विद्यार्थ्यांची भर रस्त्यात हत्या केली जात असल्याचे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. या घटनांमुळे बांगलादेशातील हिंदूंच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. बांगलादेशात अत्याचार सोसणाऱ्या अल्पसंख्याक हिंदू समाजाला उद्देशून सरसंघचालक मोहन भागवत यांनी महत्त्वाचं आवाहन केलं आहे. त्यांनी बांगलादेशातील सव्वा कोटी हिंदूंना अत्याचाराच्या विरोधात उभं राहण्याचं आवाहन केलं आहे. बांगलादेशातील सव्वा कोटी हिंदू जर आपल्या हक्कांसाठी उभे राहिले तर जगभरातील हिंदू त्यांना मदत करतील, असं वक्तव्य सरसंघचालक मोहन भागवत यांनी केलं आहे.राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. या कार्यक्रमात सरसंघचालक मोहन भागवत यांनी बांगलादेशातील अल्पसंख्याक असलेल्या हिंदू समाजाच्या नागरिकांच्या सुरक्षेवर भाष्य केलं. 'बांगलादेशमधील हिंदू आपल्या अधिकारांसाठी उभे राहिले आणि आपल्या हक्कांसाठी लढण्याचा निर्णय घेणार असतील तर संपूर्ण जगातील हिंदूंची त्यांना साथ मिळेल', असं मोहन भागवत म्हणाले.गेल्या काही महिन्यांपासून बांगलादेशात अल्पसंख्याक असणाऱ्या हिंदू समाजाच्या नागरिकांवर हल्ल्याच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. ऑगस्ट २०२४ मध्ये तत्कालीन पंतप्रधान शेख हसीना यांनी देश सोडल्यानंतर हिंदू समाजाच्या नागरिकांवर हल्ल्याच्या घटना जास्त वाढल्या. भारत विरोधी कट्टरपंथी विद्यार्थी नेता शरीफ उस्मान हादी याची काही महिन्यांपूर्वी हत्या झाली. त्यानंतर हिंसा आणखी भडकली होती. या हिंसेत बांगलादेशातील विविध भागांमधील हिंदू नागरीक, व्यापारी आणि विद्यार्थ्यांना लक्ष केलं गेलं. या हिंसेत अनेक हिंदू नागरिकांचा जीव गेला.दरम्यान, मोहन भागवत यांनी यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा सरसंघचालक हा हिंदू असेल. मग तो एससी किंवा एसटीचा देखील असू शकतो, असं मोहन भागवत म्हणाले आहेत. 'सरसंघचालक कोण बनावा? कुणी ब्राह्मण संघाचा सरसंघचालक बनू शकत नाही. कुणी क्षत्रिय, वैश्य किंवा क्षुद्र बनू शकत नाही. जो हिंदू आहे तोच सरसंघचालक बनेल. सरसंघचालक हा एससी, एसटी आहे तरी बनू शकतो किंवा दुसरा असेल तरी बनू शकतो. आम्ही हे पाहून आमच्या इथे कार्यकर्ता नियुक्ती करत नाहीत', असं सरसंघचालक मोहन भागवत म्हणाले.

# पाणीपुरी खाताना ओळख, लग्नाच्या आणाभाका, काही दिवसांनी तरुणीबाबत धक्कादायक गोष्ट समोर

**जळगाव :** तरुणीचे सौंदर्य बघून तरुण तरुणीच्या प्रेमात पडला. दोघांची पाणीपुरी खात असताना ओळख झाली. ओळखीचं रूपांतर प्रेमात झालं, पण प्रेमात काही असं घडली की, त्या तरुणाने प्रेयसीचा पद्मालय येथील जंगलामध्ये जाळून तिची हत्या केली. आरोपी तरुणाला काही दिवसानंतर कळले की, तो जिच्यावर प्रेम करायचा ती तरुणी नसून तृतीयपंथी आहे. याच रागातून ही धक्कादायक घटना घडली असल्याचं समोर आलं आहे. येथील स्वप्नील उर्फ गोलू अशोक पाटील (वय २१) आणि आकांक्षा उर्फ अजय हेमराज गद्रे या दोघांची ओळख पाणीपुरी खात असताना झाली. ओळखीचं रूपांतर प्रेमात झालं. मात्र, सदर तरुणी ही तृतीयपंथी असल्याचं लक्षात आल्यावर आणि तिने लग्नाचा तगादा लावल्यामुळे त्रस्त झालेल्या तरुणाने अखेर या प्रेम कहाणीचा अंत केला. तृतीयपंथी असलेल्या तरुणीची हत्या करून तिला जाळून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला असल्याचं समोर आलंआकांक्षा उर्फ अजय हेमराज गद्रे ही (रा.सोनरार खैरागड, छत्तीसगड) राहणार असून सध्या सुरत येथे वास्तव्याला होती. स्वप्नील २०२४ मध्ये पोलीस भरतीची परीक्षा देत नाशिकला शिक्षण घेत होता. दरम्यान, काही महिन्यापूर्वी नाशिक येथे पोलीस भरती अकादमीच्या बाहेर असणाऱ्या एका ठेल्यावर दोघांची ओळख झाली. पुढे एकमेकांचा मोबाईल नंबर घेऊन चॅटिंगद्वारे दोघांच्या ओळखी वाढल्या. ओळखीतून त्यांच्यामध्ये प्रेमसंबंध निर्माण झाले. काही दिवसानंतर आपण ज्या मुलीवर प्रेम करत आहोत ती तृतीयपंथी असल्याचं कळताच स्वप्निलने तिच्याशी संपर्क बंद केला.मात्र, आकांक्षा स्वप्निलच्या मागे लग्नाचा तगादा लावून बसली होती. तरी स्वप्निलने तिला सांगितलं की, 'आता आपल्यात काही नाही', मात्र ती तयार नव्हती. आकांक्षा पहुर येथील स्वप्निलच्या घरी देखील आली होती. स्वप्निलच्या आई-वडिलांनी त्याला 'आकांक्षाचा नाद सोड', म्हणून सांगितलं. अखेर आकांशाने 'दुसऱ्या मुलीसोबत लग्न कर आणि माझ्यासोबतही लग्न कर', असा प्रस्ताव मांडला. दोघांमध्ये तेव्हा तात्पुरता बोलणं झालं होतं. तरीही आकांक्षाने स्वप्निलच्या मागचा लग्नाचा तगादा सोडला नाही. आकांक्षाच्या त्रासाला स्वप्नील कंटाळलेला होता अखेर त्याने आकांक्षाला संपवण्याचा कठोर निर्णय घेतला.अखेर दोघांचा भेटण्याचा दिवस ठरला. सुरतवरून आकांक्षा उर्फ अजय गद्रे ही जळगाव येथे शनिवारी ३१ जानेवारी रोजी उतरली.




स्वप्नील आणि आकांक्षा दोघांनी रस्त्यामध्ये एका वाईन शॉपमधून दोन बिअरच्या बाटल्या घेतल्या. त्या बाटल्या घेऊन ते पद्मालय येथे दुपारी चार वाजता गेले. पद्मालय येथील श्री. गणपतीचं दर्शन घेतल्यानंतर त्यांनी जवळच्या जंगलात गप्पा मारण्यासाठी गेले. तेथे स्वप्निलने आकांक्षाला शेवटचं पुन्हा एकदा समजावलं की, 'मी तुझ्याशी लग्न करू शकत नाही. माझा नाद सोड', पण, आकांक्षाने काही ऐकलं नाही. त्यानंतर स्वप्निल आणि आकांक्षामध्ये झटापटी झाली आणि ती खाली पडली. त्यानंतर अर्धमेले अवस्थेत आकांक्षाच्याच ओढणीने तिचा गळा दाबून तिला जीवेठार मारले. तिचा मृत्यू झाल्याची खात्री केल्यानंतर त्याने त्याच्या दुचाकीच्या डिक्कीतून पेट्रोल आणले आणि आकांक्षाच्या शरीरावर टाकून तिला पेटवून तेथून स्वप्निलने पळ काढला.४ फेब्रुवारी रोजी पद्मालय वनपरिक्षेत्रात अर्धवट जळालेला मृतदेह आढळून आला होता. मृतदेहाची ओळख पटू नये यासाठी चेहरा व छातीचा भाग ज्वलनशील पदार्थ टाकून जाळलेला होता. घनदाट जंगलात मोबाईलला नेटवर्क देखील नव्हतं. मानवी वदर्ळ नसल्याने कोणाकडून काही सुगावा लागणं शक्य नसल्यानं मृतदेहाची ओळख पटवणं पोलिसांसोबत मोठं आव्हान होतं. यासंदर्भात जिल्हा पोलीस अधीक्षक डॉक्टर महेश्वर रेड्डी यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक राहूल गायकवाड यांना सूचना दिल्या. त्यानुसार त्यांनी उपनिरीक्षक सोपान गोरे, शरद बागल, जितेंद्र ओल्ड, ईश्वर पाटील आणि विनोद पाटील यांचे पथक हाताशी घेतले.मृतदेहाच्या शवविच्छेदनावेळी तो एक दिवसापूर्वीच जाळल्याचं वैद्यकीय अधिकाऱ्यांचं म्हणणं होतं. मात्र, फॉरेन्सिक तज्ञांनी मृतदेहावरील अळ्यांच्या वाढीवरून मृत्यू ३० किंवा ३१ जानेवारी दरम्यान झाल्याचं स्पष्ट केलं. तसेच पथकाने मृतदेहाचे निरीक्षण केलं असताना पायाच्या नखावर मॅजेंटा रंगाची नेल पॉलिश व नाकात सोन्याची मुरनी असल्याचं आढळलं. तोच धागा पकडून व फॉरेन्सिक तज्ज्ञांच्या अहवालानुसार पोलिसांनी त्या दिशेने माहिती संकलित करणं सुरू केलं. त्यावरून मयत कुठून आला? कोणासोबत आला? याची माहिती संकलित केली. तरुणाने तृतीयपंथीयाला पद्मालयाला नेलं व गणपतीचं दर्शन घेतलं. त्यानंतर पद्मालयाच्या जंगलात नेऊन तृतीयपंथीयाची हत्या केल्याचं स्पष्ट झालं गोपनीय माहिती भौतिक व तांत्रिक पुराव्यांच्या आधारे पोलिसांनी स्वप्नील पाटीलला ताब्यात घेतलं. त्याची सखोल चौकशी केल्याने त्याने हत्येची कबूली दिली.

## १० लाख देतो', म्हणून कारमध्ये नेलं, पुण्याच्या अथर्वला जालन्यात संपवल

**जालना :** जालना जिल्ह्यातील मंठा तालुक्यातील मौजे पेवा येथील ग्राम पंचायत पाणीपुरवठा विहिरीत एका पुरुष जातीचा मृतदेह दिनांक ५ फेब्रुवारी सायंकाळी गावातील काही नागरिकांना आढळून आला. याची माहिती तात्काळ मंठा पोलिसांना देण्यात आली. त्यानंतर मंठा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मनोज कुमार राठोड यांनी फौज फाट्यासह घटनास्थळी धाव घेतली, व नागरिकांच्या मदतीने मृतदेह वर काढला व त्याची तपासणी केली. मृतदेहाच्या गळ्याला आवळून त्याचा खून करून विहिरीत टाकल्याचं पोलिसांच्या तपासात समोर आलं. यावेळी पोलिसांनी कसून चौकशी केली असता हा मृतदेह अथर्व गणेश लोखंडे (वय २०, रा. मरकळ ता. खेड, जिल्हा पुणे) याचा असल्याचं तपासात समोर आलंपुणे जिल्ह्यातील मरकळ तालुका खेड येथील अथर्व गणेश लोखंडे याच्या हत्याच्या २ दिवसाआधी त्याचा मित्र व सध्या संशयित आरोपी असलेला किसन उर्फ कृष्णा राजाराम धोत्रे याच्याकडे काही पैशांचा व्यवहारासाठी आला होता. मात्र त्यांचं क्षुल्लक कारणवारुन फिस्कटलं आणि कारमध्ये संशयित आरोपी किसन उर्फ कृष्णा राजाराम धोत्रे याने अथर्व लोखंडे याला १० लाख रुपये देण्याचं सांगून पेवा तालुका मंठा येथे आणलं. तेथे २ साथीदारांच्या मदतीने दोरीने गळा आवळून त्याचा खून केला.हे सर्व आरोपी एवढ्यावरच थांबले नाही, तर त्यांनी अथर्वचा गळा आवळून हत्या करून पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह विहिरीत टाकून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला.




पेवा गावातील ग्रामपंचायत पाणीपुरवठा विहिरीत अथर्वचा फेकून दिला. दुसऱ्या दिवशी ही बाब गावकऱ्यांच्या व पाणीपुरवठा कर्मचाऱ्यांच्या लक्षात आली. यावेळी एकच खळबळ गावात उडाली. विहिरीत एक अनोळखी तरुणाचा मृतदेह पाण्यावर तरंगत असल्याची माहिती वाऱ्यासारखी संपूर्ण परीसरात पसरली. सदरची माहिती मंठा पोलीस ठाण्याला देण्यात आली. पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. स्थानिक नागरिकांच्या मदतीने मृतदेह विहिरीबाहेर काढण्यात आला. मृताच्या अंगावर पांढऱ्या रंगाचा टी-शर्ट असून दोरीने हातपाय बांधलेले होते. तसेच पोटाजवळ दगड बांधलेला आढळून आला. यावरून अज्ञात व्यक्तीने खून करून पुरावा नष्ट करण्यासाठी मृतदेह विहिरीत टाकल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट झालं.पेवा गावचे पोलीस पाटील यांच्या फिर्यादीवरून ५ फेब्रुवारी २०२६ रोजी मंठा पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन मंठा पोलिसांनी तपास सुरू केला. तपासादरम्यान अनोळखी मृताची ओळख पटवण्यात पोलिसांना यश आलं. पुढील तपासात आरोपी किसन उर्फ कृष्णा राजाराम धोजे यास ताब्यात घेण्यात आलं.

## भावजयीचा विनयभंग, भावालाही रॉडने बेदम मारहाण

**म्हसळा (रायगड ):** म्हसळा तालुक्यातील दिघी रोड परिसरात कौटुंबिक वादातून घडलेल्या एका धक्कादायक घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. डॉक्टरकडे जाण्याच्या साध्या प्रश्नावरून सुरू झालेल्या वादाचे रूपांतर थेट हिंसाचार, शिवीगाळ, धमकी आणि महिलेच्या विनयभंगापर्यंत गेले. या प्रकरणी म्हसळा पोलीस ठाण्यात दिराविरुद्ध गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, दिनांक ०७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास म्हसळा पोलीस ठाणे हद्दीतील दिघी रोड, ता. म्हसळा येथे ही घटना घडली. या प्रकरणातील महिला फिर्यादी व पुरुष साक्षीदार हे नात्याने पत्नी-पती असून आरोपी हा फिर्यादीचा दिर आहे. साक्षीदार यांनी आरोपीला त्याच्या वडिलांना गोरेगाव येथे डॉक्टरकडे घेऊन जायचे असल्याचे सांगून, तू गाडी कुठे



घेऊन चाललास?ङ्क असे विचारले. याच कारणावरून आरोपी संतापला आणि त्याने उलट-सुलट उत्तर देत वाद सुरू केला. वाद अधिक चिघळताच आरोपीने तेथे पडलेला लोखंडी रॉड उचलून साक्षीदार पतीवर बेदम मारहाण केली. या मारहाणीत साक्षीदाराच्या अंगावरील टी-शर्ट फाटला. पतीवर होणारी मारहाण थांबवण्यासाठी महिला फिर्यादी मध्ये गेल्या असता आरोपीने वाईट उद्देशाने त्यांच्या अंगावरील टॉप ओढला, ओढणी फाडली आणि त्यांच्या स्त्री मनास लज्जा उत्पन्न होईल असा कृत्य करत विनयभंग केला. एवढ्यावरच न थांबता आरोपीने महिलेलाही त्याच लोखंडी रॉडने मारहाण केली.दरम्यान आरोपीने ङ्गतुम्ही सगळे घराबाहेर निघा, नाहीतर तुम्हाला मारून टाकीन,ङ्ग अशी जीवे मारण्याची धमकी देत अश्लील शिवीगाळ केली. या प्रकारामुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. या घटनेबाबत महिला फिर्यादी यांच्या तक्रारीवरून म्हसळा पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर १५/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ११८(१), ७४, ३५२, ३५१(२)(३) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस हवालदार राम चंद्र बांगर हे करत आहेत. कौटुंबिक नात्यातील व्यक्तीकडूनच अशा प्रकारचा गंभीर अत्याचार घडल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून आरोपीवर कठोर कारवाईची मागणी होत आहे.

## रात्रीचा थरार, कोयत्याचा वार; पोलिसांचाही जोरदार पलटवार

**बारामती :**भिगवण-बारामती रोडवरील जैनकवाडी फाटा येथे रात्रीच्या वेळी कोयता व लोखंडी दांडक्याचा धाक दाखवत कार अडवून प्रवाशांवर प्राणघातक हल्ला करून जबरदस्तीने चोरी केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणी बारामती तालुका पोलीस ठाण्यात ६ ते ७ अनोळखी इसमांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.फिर्यादी विश्वराजे चंद्रशेखर पाटील व त्यांचे सहकारी मारुती सुझुकी कॅरी गाडीतून प्रवास करत असताना, जैनकवाडी फाट्याजवळ ६ ते ७ अनोळखी इसमांनी अचानक गाडी अडवली. हल्लेखोरांनी गाडीच्या काचा फोडून कोयता व लोखंडी दांडक्याचा धाक दाखवत दहशत निर्माण केली. यावेळी फिर्यादीच्या डोक्यावर कोयत्याने वार करून जखमी करण्यात आले. या हल्ल्यात फिर्यादीची बॅग, मोबाईल फोन, चार्जिंग पॉवर बँक, एटीएम कार्ड



व रोख रक्कम असा एकूण १२ हजार २० रुपयांचा मुद्देमाल हल्लेखोरांनी लुटून नेला.टोळी धुडगूस घालत असल्याची माहिती होमगार्ड जवान सूर्यवंशी यांनी दिल्यानंतर, पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. घटनेचे गांभीर्य ओळखून त्यांनी आरोपींचे वर्णन व वाहनांच्या आधारे शोधमोहीम सुरू केली. याबाबत भिगवण, दौंड व यवत पोलीस ठाण्यांना सतर्क करण्यात आले.मोटारसायकल व रिक्षाच्या मदतीने पळणाऱ्या आरोपींचा केडगाव चौफुला-सुपा रोडवर थरारक पाठलाग करण्यात आला. पोलिसांनी सखोल शोधमोहीम राबवत पाचपैकी चार आरोपींना ताब्यात घेण्यात यश मिळवले, तर एक आरोपी फरार आहे. या आरोपींनी कुरकुंभ येथील पेट्रोल पंपावरील सेल्समन रवींद्र महेश खडके यांच्यावर सुद्धा कोयत्याने गंभीर वार केला होता.

# थोडक्यात बचावलेल्या इंग्लंडचा विजयासाठी संघर्ष

**मुंबई/वृत्तसंस्था :** दोन वेळचा चॅम्पियन इंग्लंड संघ टी-२० विश्वचषक स्पर्धेतील आपल्या पहिल्याच सामन्यात धक्कादायक पराभव होण्यापासून बचावला. नेपाळने त्यांच्या तोंडाला फेस आणला होता. पण अनुभवात कमी पडल्याने इंग्लंड संघाला कसाबसा ४ धावांनी विजय मिळविता आला. १८ चेंडूत नाबाद ३९ धावा व १७ धावांत एक बळी मि ळिवणाऱ्या विल जॅक्सला सामनावीराचा पुरस्कार मिळाला.

नेपाळ संघ ऐतिहासिक विजय मिळविण्याच्या अगदी उंबरठ्यावर आला होता. पण अनुभवात ते कमी पडले आणि त्यांना ४ धावांनी निसटता पराभव स्वीकारावा लागला. इंग्लंडने प्रथम फलंदाजी करून ७ बाद १८४ अशी आव्हानात्मक धावसंख्या उभारली. लोकेश बाम (२० चेंडूत नाबाद ३९) इंग्लंडला धक्का देण्यास सज्ज झाला होता. पण शेवटच्या षटकात त्याला विजय साकार करता आला नाही. या षटकात नेपाळला १० धावांची गरज असताना त्यांना चौकार आवश्यक होता. सॅम करनने अचूक मारा करीत त्यांना रोखण्यात यश मिळविले. त्याने यॉर्कर्सचा मारा करीत नेपाळला या षटकात फक्त पाचच धावा दिल्याने नेपाळला २० षटकांत ६ बाद १८० धावा जमविता आल्या. या सामन्याला वानखेडेवर १७००० प्रेक्षकांनी गर्दी केली होती. त्यात नेपाळी चाहत्यांचे प्रमाण अधिक होते.

कर्णधार रोहित पौडेलने ३९, दीपेंद्र सिंग आयरीने ४४, कुशल भुर्तेलने २९ व लोकेश यांनी बऱ्यापैकी प्रयत्न केले. लोकेशने अखेरच्या



टप्प्यात चार चौकार, २ षटकार मारत झुंजार खेळ केला. शेवटच्या ३ षटकांत ४६ धावांची गरज असताना लोकेशने आर्चरच्या षटकात २ षटकार ठोकले आणि १९ व्या षटकात ल्युक वुडला सलग दोन चौकार फटकावले. त्याआधी भुर्तेलने जोरदार फटकेबाजी करीत तिसऱ्या गड्यासाठी पौडेलसमवेत ८२ धावांची भागीदारी केली होती. भुर्तेलने १७ चेंडूत २९ धावा फटकावल्या.

तत्पूर्वी, जेकब बेथेल (३५ चेंडूत ४ चौकार, ४ षटकारांसह ५५) व कर्णधार हॅरी ब्रुक (३२ चेंडूत ४ चौकार, ३ षटकारांसह ५३) यांची जलद अर्धशतके आणि विल जॅक्सच्या १८ चेंडूत १ चौकार, ४ षटकारांसह नाबाद ३९ धावांच्या बळावर इंग्लंडने ७ बाद १८४ धावा केल्या होत्या. याशिवाय जोस बटलरने १७ चेंडूत २६ धावा जमविल्या. बेथेल व ब्रुक यांनी चौथ्या गड्यासाठी ७१ धावांची भागीदारी केली. इंग्लंडने शेवटच्या तीन षटकांत ४५ धावांची भर घातली, त्यात जॅक्सच्या ३९ धावांचा समावेश आहे. आयरी व नंदन यादव यांनी प्रत्येकी २ बळी टिपले.

इंग्लंडने २० षटकांत ७ बाद होत विजयी १८४ धावा ठोकल्या. यात बटलर १७ चेंडूत २६, बेथेल ३५ चेंडूत ५५, ब्रुक ३२ चेंडूत ५३, विल जॅक्स १८ चेंडूत नाबाद ३९, अवांतर ५. दीपेंद्र सिंग २-२३, नंदन यादव २-२५.

नेपाळने २० षटकांत ६ बाद होत १८० धावा केल्या. यात कुशल भुर्तेल १७ चेंडूत २९, रोहित पौडेल ३४ चेंडूत ३९, दीपेंद्र सिंग आयरी २९ चेंडूत ४४, लोकेश बाम २० चेंडूत नाबाद ३९, अवांतर १०. डॉसन २-२१, जॅक्स १-१७, सॅम करन १-२७.

# अफगाणिस्तानवर ५ गड्यांनी मात : सीफर्ट, फिलिप्स ठरले विजयाचे हिरो

**चेन्नई/वृत्तसंस्था :** न्यूझीलंडने आयसीसी टी-२० वर्ल्ड कप २०२६ स्पर्धेच्या मोहिमेची सुरुवात विजयाने केली. रविवारी झालेल्या सामन्यात किवीज संघाने अफगाणिस्तानवर ५ गडी राखून मात केली. अफगाणिस्तानने एमए चिदंबरम स्टेडियममध्ये न्यूझीलंडसमोर १८३ धावांचे आव्हान ठेवले होते. न्यूझीलंडने हे आव्हान १७.३ षटकांत ५ विकेट्स राखून पूर्ण केले. या विजयासह न्यूझीलंडने टी-२० विश्वचषक २०२४ मधील पराभवाचा बदला घेतला.

प्रारंभी, अफगाणिस्तानने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. सलामीवीर रहमानुल्ला गुरबाजने २७ धावा करत संघाला चांगली सुरूवात करून दिली. दुसरीकडे, इब्राहिम झद्रन मात्र स्वस्तात बाद झाला. पाठोपाठ गुरबाजही माघारी परतला. यानंतर गुलबदिन नईबने ३५ चेंडूत ३ चौकार व ४ षटकारांच्या मदतीने ६३ धावा केल्या. सदिकउल्ला अटलने २९ धावांचे योगदान दिले तर दारविश रसूलीने १३ चेंडूत २० धावा केल्या. तर ओमरझाईने १४ आणि नबीने १० धावांचे योगदान दिले. यासह अफगाणचा संघ २० षटकांत ६ बाद १८२ धावा करण्यात यशस्वी ठरला. किवी संघाकडून लॉकी फर्ग्युसनने दोन बळी घेतले, तर मॅट हेन्री, जेकब डफफी आणि रचिन रवींद्रने प्रत्येकी एक बळी घेतला.

विजयी लक्ष्याचा पाठलाग करताना न्यूझीलंडची सुरुवात खराब झाली. अवघ्या १४ धावांवर त्यांनी दोन विकेट्स गम ावल्या. संघ अडचणीत असताना सलामीवीर टिम सिफर्ट आणि ग्लेन फिलिप्स या दोघांनी तिसऱ्या विकेटसाठी ४६ चेंडूत ७४



धावांची भागीदारी रचली. राशिद खानने फिलिप्सला ४२ धावांवर तंबूचा रस्ता दाखवत सामन्यात ट्विस्ट आणले. यानंतर टीम सिफर्टने मात्र ४२ चेंडूत ६५ धावांची महत्वपूर्ण खेळी साकारली. पण तो बाद झाल्यानंतर अफगाणिस्तान चमत्कार करेल, असे वाटत होते. पण मार्क चॅपमन २८, डॅरिल मिचेल नाबाद २५ आणि कर्णधार मिचेल सँटनरने ८ चेंडूत १७ धावा करत संघाला विजय मिळवून दिला. अफगाण संघाकडून मुजीब रेहमानने २ तर अझमतुल्ला ओमरझाई, रशीद खान, मोहम्मद नबी यांनी प्रत्येकी १-१ विकेट घेतल्या.

# नेमबाजीत भारताचे पदकांचे अर्धशतक

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** येथील डॉ. कर्णीसिंग नेमबाजी संकुलात सुरु असलेल्या आशियाई रायफल-पिस्तुल नेमबाजी चॅम्पियनशिप स्पर्धेत रविवारी यजमान भारताच्या नेमबाजाने पदकांचे अर्धशतक पार केले. मिश्र सांघिक १० मी. एअर रायफल नेमबाजी प्रकारात इलावेनिल वलरिवन आणि अर्जुन बबुता यांनी भारताला सुवर्णपद मिळवून दिले.

मिश्र सांघिक कनिष्ठांच्या १० मी. एअर रायफल नेमबाजीत भारताच्या हिमांशू धिल्लाँ आणि शांभवी क्षीरसागर यांनी सुवर्णपदक मिळविले. तर युवा गटात १० मी. एअर रायफल मिश्र सांघिक प्रकारात भारताच्या हृदया श्रीकोंडूर आणि अन्शुल बात्रा यांनी सुवर्णपदक पटकाविले. २०१६ च्या रिओ ऑलिम्पिक स्पर्धेत भारताचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या गुरप्रित सिंगने पुरुषांच्या २५ मी. स्टँडर्ड पिस्तुल नेमबाजीत सुवर्णपदक मिळविले. या क्रीडा प्रकारात भारताच्या स्पर्धकांनी आपले निर्विवाद वर्चस्व राखले. हर्ष गुमाने रौप्य तर अमनप्रित सिंगने कांस्यपदक घेतले. कनिष्ठ विभागात या क्रीडा प्रकारात भारताच्या सुरज शर्मा, मुकेश नेलावल्ली आणि तनिष्क नायडू यांनी अनुक्रमे सुवर्ण, रौप्य आणि कांस्यपदक घेतले. या क्रीडा प्रकारात भारताच्या वरिष्ठ आणि कनिष्ठ सांघिक गटातही भारतीय स्पर्धकांनी सुवर्णपदके घेतली. स्पर्धेच्या पाचव्या दिवसाअखेर भारताने पदकतक्त्यात ३४ सुवर्ण, १२ रौप्य आणि ८ कांस्य अशी एकूण ५४ पदकांसह पहिले स्थान पटकाविले आहे. उझबेकिस्तान पदकतक्त्यात दुसऱ्या स्थानावर असून त्यांनी ३ सुवर्ण आणि १ रौप्य तर इंडोनेशियाने १ सुवर्ण, २ रौप्य आणि ४ कांस्यपदकांसह तिसरे स्थान मिळविले आहे. १० मी. एअर रायफल मिश्र सांघिक नेमबाजी प्रकारात भारताच्या इलावेनिल आणि अर्जुन यांनी ५०५.५ गुणासह सुवर्णपदक पटकाविले. इलावेनिलने वैयक्तिक गटातही सुवर्णपदक यापूर्वी घेतले आहे. सांघिक प्रकारात इलावेनिलने २५३.४ तर अर्जुनने २५१.६ गुण मिळविले.

या क्रीडा प्रकारात युनजी आणि किम ऊरिम यांनी ५०१.० गुणासह रौप्य तर जपानच्या नोबाटा आणि ओकेदा यांनी ४३७.१ गुणासह कांस्यपदक घेतले. भारताच्या हिमांशु धिल्लाँ आणि शांभवी क्षीरसागर या भारतीय जोडीने या क्रीडा प्रकारात वैयक्तिक गटात तसेच मिश्र सांघिक प्रकारातही सुवर्णपदके मिळविली. मिश्र सांघिक प्रकारात या जोडीने ५०२.४ गुण घेतले. कझाकस्तानच्या ॲलिना आणि केबुलोव्ह यांनी रौप्य तर मालदिवच्या ईशा शाहिद आणि मेदा म ोहम्मद यांनी कांस्यपदक घेतले.

# यजमान श्रीलंकेचा आयर्लंडवर अडखळत विजय



**कोलंबो/वृत्तसंस्था :** यजमान श्रीलंकन संघाने घरच्या मैदानावर आयर्लंडचा पराभव करत टी-२० विश्वचषकातील पहिला सामना जिंकला आहे. कोलंबोत झालेल्या या सामन्यात श्रीलंकेने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ६ बाद १६३ धावा केल्या. यानंतर विजयी आव्हानाचा पाठलाग करताना आयर्लंडचा संघ १९.५ षटकांत १४३ धावांत ऑलआऊट झाला. लंकन संघाने हा सामना २० धावांनी जिंकत दोन गुणाची कमाई केली. १९ चेंडूत ४४ धावांची आक्रमक खेळी करणाऱ्या कमिंदू मेंडिसला सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आले.

श्रीलंकेने दिलेल्या १६४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना कर्णधार पॉल स्टर्लिंगला क्लीन बोल्ड करत तीक्ष्णाने संघाला दणक्यात सुरूवात करून दिली. यानंतर अडायर व टेक्टर यांनी ३२ धावांची चांगली भागीदारी रचली. पण, अडायरला (३४ धावा) हसरंगाने क्लीन बोल्ड करत संघाला महत्त्वाची विकेट मि ळवून दिली. यानंतर टेक्टर व टकेर यांनी ४९ धावांची भागीदारी करत संघाचा डाव सावरला. पण हसरंगाच्या फिरकीने परत कमाल केली. टेक्टर ३४ चेंडूत ४० धावा करत बाद झाला. तर टकेर २१ धावांवर माघारी परतला. यानंतर इतर फलंदाजांनी लंकन गोलंदाजासमोर हार पत्करली. आयर्लंडचा संपूर्ण संघ १४३ धावांवर ऑलआऊट झाला.

नाणेफेक गमावल्यानंतर प्रथम फलंदाजी करणाऱ्या श्रीलंकन संघाला चौथ्या षटकात धक्का बसला. पथुम निसांका २४ धावा करुन माघारी परतला. यानंतर सलामीवीर कामिल मिशाराने १४ धावा जोडल्या तर यष्टीरक्षक-फलंदाज कुसल मेंडिसने नाबाद ५६ धावांची म हत्त्वपूर्ण खेळी केली. त्यानंतर आलेल्या कामिंदू मेंडिसने १९ चेंडूत २३१.५८ च्या स्ट्राईक रेटने ४ चौकार व २ षटकारांसह ४४ धावा केल्या. ज्यामुळे श्रीलंकेचा संघ २० षटकांत ६ बाद १६३ धावांपर्यंत मजल मारता आली.

# अभिनेत्रीने सुरू केला कॅफे, उषा नाडकर्णींनी केलं उद्घाटन

**मुंबई :** मनोरंजन विश्वातील अनेक कलाकार मंडळी आता अभिनयासह उद्योग क्षेत्रातही पाऊल टाकत आहेत. मराठीसह हिंदी कलाविश्वातील अनेक कलाकारांनी अभिनय क्षेत्रात कार्यरत असण्याबरोबरच उद्योग क्षेत्रात आपली नवी सुरुवात केली आहे. कोणी स्वत:चा साड्यांचा ब्रँड, कुणी दागिन्यांचा ब्रँड, कुणी स्वत:चं सेलॉन सुरू केलं, तर कुणी स्वत:चं हॉटेल.

अशातच आता यात आणखी एका लोकप्रिय टीव्ही अभिनेत्रीची भर पडली आहे, ही अभिनेत्री म्हणजे अर्चना गौतम. बिग बॉस १६ आणि 'सेलिब्रिटी मास्टरशेफ' या शोमधून प्रसिद्धीझोतात आलेली अर्चना गौतम आता बिझनेसवूमन झाली आहे. अभिनेत्रीने नुकतंच स्वत:चा कॅफे सुरू केला आहे. दिवाळीच्या शुभमुहूर्तावर तिनं आपल्या या नवीन कॅफेची सुरुवात केली आहे.

र्चनानं सुरू केलेल्या या नवीन कॅफेचं उद्घाटन ज्येष्ठ मराठी अभिनेत्री उषा नाडकर्णी यांच्या हस्ते पार पडलं. याचे काही खास फोटो अर्चनानं आपल्या सोशल मीडिया अकाउंटद्वारे शेअर केले आहेत. तसंच अर्चनानं उषा नाडकर्णींचे आभारही मानले आहेत. अर्चना म्हणते, जे लोक आपले असतात,



ते नेहमीच आपल्याशी मनानं जोडलेले राहतात. उषा नाडकर्णी तुमचे मन:पूर्वक आभार. दिवाळीच्या शुभप्रसंगी Oye Churros कॅफेचे उद्घाटन तुमच्या हातून झालं ही आमच्यासाठी आनंदाची आणि सन्मानाची गोष्ट आहे. या नव्या प्रवासासाठी तुमचे आशीर्वाद मिळणं, ही खूप सुंदर सुरुवात आहे.

अर्चनानं शेअर केलेल्या या नव्या कॅफ ेच्या फोटोंवर प्रेक्षकांनी कमेंट्सद्वारे तिचं कौतुक केलं आहे. तसंच तिच्या या नव्या सुरुवातीसाठी तिला खास शुभेच्छाही दिल्या आहेत. दरम्यान, बिझनेसवूमन झालेली अर्चना ही सध्याच्या लोकप्रिय टीव्ही अभिनेत्रींपैकी एक आहे. तिनं मॉडेल म्हणून आपल्या करिअरची सुरुवात केली. २०१५ मध्ये आलेल्या 'ग्रेट ग्रँड मस्ती' या बॉलीवूड चित्रपटातील एका छोट्या भूमिकेतून तिनं अभिनय क्षेत्रात पाऊल टाकलं. यानंतर तिनं 'हसीना पारकर' आणि 'बारात कंपनी'सारख्या चित्रपटांमध्येही काम केलं आहे.

चित्रपटांबरोबरच अर्चना 'साथ निभाना साथिया' आणि 'ये है आशिकी'सारख्या टीव्ही मालिकांम ध्येही दिसली आहे. मालिका आणि चित्रपटानंतर तिनं आपला मोर्चा रिॲलिटी शोकडे वळवला. ती 'बिग बॉस १६'मध्ये सहभागी झाली होती आणि नंतर 'खतरों के खिलाडी'मध्येही ती दिसली. शिवाय नुकताच तिनं 'सेलिब्रिटी मास्टरशेफ' हा शोदेखील केला. यानंतर आता अर्चनाने व्यवसाय क्षेत्रात आपली नवीन सुरुवात केली आहे. तिनं स्वत:चा कॅफे सुरू केला आहे.

## महेश कोठारे यांच्या समर्थनार्थ मेघा धाडेची पोस्ट चर्चेत

**मुंबई :** अलीकडेच अभिनेते, निर्माते महेश कोठारे यांच्या एका व्हायरल व्हीडियोनंतर जोरदार चर्चा सुरू झाल्या आहेत. या व्हीडियोमध्ये महेश कोठारे हे भाजपावर स्तुतिसुमने उधळताना दिसत आहेत. एका कार्यक्रमात त्यांनी मी मोदी भक्त आहे आणि मुंबई महापालिकेत कमळच फ ुलेल असे वक्तव्य केले. तसेच त्यांनी संजय राऊत आणि माजी महापौर किशोरी पेडणेकर यांच्यावरही टीका केली.

यानंतर महेश यांच्यावर अनेकानी टीका केल्या. पण अभिनेत्री मेघा धाडे मात्र महेश यांची पाठराखण केली आहे. म ेघा यांनी सोशल मीडिया पोस्ट केली आहे. ज्यात त्या म्हणतात, 'अभिनेत्री उर्मिला मातोंडकरने उध्दव सेना जॉइन केली होती तेव्हा कोणत्याही भाजप प्रवक्त्याने तिच्या व्यक्तिस्वातंत्र्यावर आक्षेप घेतला नव्हता, सुप्रसिद्ध दिग्दर्शक महेश मांजरेकरने तर मनसेच्या तिकिटावर लोकसभा लढवली होती तरी कोणी आक्षेप घेतला नाही.



परंतु महेश कोठारेंनी मोदींची तारीफ केली की उध्दव सेनेला इंगळ्या डसल्या कोठारेंवर टीकेची झोड उठवली गेली ! त्यांच्या मराठीपणावर देखील शंका घेण्यात आली. हे असे झाले कारण कोठारे जे बोलले ते मनापासून बोलले कोणत्या तिकीटाच्या लालसेपोटी, कोणाचे पाकीट मिळवण्यासाठी ते असे बोलले नाही एक सामान्य मुंबईकरांची जी भावना आहे जो मुंबईकर आधी रस्त्यावर धक्के खायचा तो आता मेट्रोत गार वाऱ्यात वेगाने प्रवार, करतोय जो मुंबईकर आधी ट्रॅफिक मध्ये अडकायचा आता तो अटल सेतूवरून सुसाट धावतोय त्या मुंबईकरांच्या भावनांचे प्रगटीकरण कोठारेंच्या भाषणात झाले आणि म्हणूनच उध्दव सेनेच्या पायाखालची जमीन सरकली ! आणि हे सत्यात देखील उतरणार आहे.'या पोस्टवर अभिनेते शरद पोंक्षे यांनीही कमेंट केली आहे. ते आपल्या पोस्टमध्ये म्हणतात, मीही मोदांचं कौतुक करतो अमित शहांचं कौतूक करतो.जेजे चांगले आहेत त्यांचं करतो. सद्य परिस्थितीत भाजप शिवाय देशाला पर्याय नाही माझं मत मांडले. द्या किती शिव्या द्यायच्यात त्या.' तर अनेकांनी या पोस्टवर तिने राजकारणात उतरु नये अशीही कमेंट केली आहे.

## हास्याचा फवारा घेऊन येणार किस किस को प्यार करु २

**मुंबई :** कॉमेडीयन कपिल शर्माचा नव्या चित्रपटाचे मोशन पोस्टर रिलीज झाले असून प्रदर्शनची तारीख आणि कलाकार देखील कोण असतील, हे कन्फर्म करण्यात आले आहे. कपिल शर्माचा किस किस को प्यार करू हा चित्रपट २०१५ मध्ये रिलीज झाला होता. आता पुन्हा मोठ्या पड्यावर या चित्रपटाचा सीक्वल येतोय. निर्मात्यांनी चित्रपटाचे मोशन पोस्टर जारी करत रिलीज डेटची अधिकृत घोषणा केलीय.

चित्रपटाचे नवे पोस्टर नुकतेच रिलीज करण्यात आले असून त्यात कपिल शर्मा पुन्हा एकदा आपल्या खास स्टाईलमध्ये दिसत आहे. सोशल मीडियावर हा पोस्टर व्हायरल झालाय. 'किस किसको प्यार करूं' या चित्रपटात कपिलची तीन पत्नी आणि एक गर्लफ्रेंड अशा विनोदी



गोंधळावर आधारित कथा होती. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई करत कपिलचा सिनेमॅटिक डेब्यू सुपरहिट ठरला होता. आता दुसऱ्या भागात कपिलच्या व्यक्तिरेखेत आणखी भन्नाट ट्विस्ट असणार असल्याचं दिग्दर्शकांनी सांगितलं आहे.

## थामा Vs एक दिवाने की दिवानियत, बॉक्स ऑफिसवर कोणता सिनेमा ठरला वरचढ?

**मुंबई :** सध्या बॉक्स ऑफिसवर 'एक दिवाने की दिवानियत' व 'थामा' या सिनेमांचा जलवा पाहायला मिळतोय. दोन्ही चित्रपटांना प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळतोय. त्यामुळे दोन्ही चित्रपट चांगली कामगिरी करत आहेत. २१ ऑक्टोबरला रिलीज झालेल्या 'एक दिवाने की दिवानियत' व 'थामा'ने तीन दिवसांत किती कमाई केली, ते जाणून घेऊयात.

आयुष्मान खुराना आणि रश्मिका मंदाना यांच्या 'थामा' या चित्रपटाने प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. हा चित्रपट पाहण्यासाठी प्रेक्षक चित्रपटगृहांमध्ये गर्दी करत आहेत. या हॉरर कॉमेडीने रिलीजच्या फक्त तीन दिवसांतच जबरदस्त कमाई केली आहे.




या चित्रपटाने अनेक सिनेमांचे रेकॉर्ड मोडले आहेत. सॅकनिल्कच्या आकडेवारीनुसार, 'थामा' ने रिलीजच्या पहिल्या दिवशी २४ कोटी कमावले. दुसऱ्या दिवशी थामाच्या कमाईत घसरण झाली आणि १८.६ कोटींचे कलेक्शन केले. थामाने रिलीजच्या तिसऱ्या दिवशी १२.५० कोटी कमावले. थामाचे तीन दिवसांचे कलेक्शन ५५.१० कोटींवर पोहोचले आहे.

थामाने काजोलच्या 'मा' सिनेमाच्या लाइफटाइम कलेक्शनला मागे टाकले आहे. 'मा' ने भारतात ३६.०८ कोटी आणि जगभरात ४९.७५ कोटी कमावले. आता थामा लवकरच वरुण धवनच्या 'भेडिया' ला मागे टाकेल. भेडियाने भारतात ६८.९९ कोटींचे कलेक्शन केले होते. सनम तेरी कसम फेम हर्षवर्धन राणे व सोनम बाजवा यांच्या 'एक दिवाने की दिवानियत'ने देखील बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई केली आहे. सिनेमाने पहिल्या दिवशी ९ कोटी कमावले, दुसऱ्या दिवशी ७.५ कोटी कम ावले आणि तिसऱ्या दिवशी ६ कोटी रुपये कमावले. 'एक दिवाने की दिवानियत'चे तीन दिवसांचे कलेक्शन २२.७५ कोटी रुपये झाले आहे. 'एक दिवाने की दिवानियत'ने होमबाउंड (४.५७ कोटी), द बंगाल फाइल्स ९ (१९.५९ कोटी), निकिता रॉय (१.२८ कोटी), आंखों की गुस्ताखियां (१.८० कोटी), केसरी वीर (१.८८ कोटी), कंपकंपी (१.५० कोटी), द भूतनी (१२.५२ कोटी), फुले (६.७६ कोटी), ग्राउंड झिरो (७.७७ कोटी), क्रेझी (१४.०३ कोटी), सुपरबॉयज ऑफ मालेगाव (५.३२ कोटी), मेरे हसबंड की बीवी (१२.२५ कोटी), लव्हयापा (७.६९ कोटी) आणि इमर्जन्सी (२०.४८ कोटी) या चित्रपटांच्या लाइफटाइम कलेक्शनला मागे टाकलं आहे.

## हार्दिकने माहिकाचे रिलेशनशीप केले कन्फर्म!

**मुंबई :** भारतीय क्रिकेटपटू हार्दिक पांड्या पुन्हा एकदा चर्चेत आला आहे, मात्र या वेळी कारण क्रिकेट नव्हे तर त्याचं खासगी आयुष्य आहे. अलीकडेच हार्दिकने सोशल मीडियावर काही खास फोटो शेअर केले आहेत, ज्यातून त्याने मॉडेल माहीका शर्मासोबतचं नातं अधिकृत केल्याचं स्पष्ट होत आहे. क्रिकेट विश्वातील हा नवा 'लव्ह एंगल' सध्या सोशल मीडियावर ट्रेंड होत आहे. काही तासांतच फोटोंना लाखो लाईक्स आणि हजारो कमेंट्स मिळाल्या आहेत. हार्दिकचा हा रोमँटिक अंदाज पाहून चाहत्यांमध्ये चर्चेला उधाण आलं आहे. माहीका शर्मा ही ग्लॅमरस मॉडेल असून, तीने अनेक जाहिराती आणि म्युझिक व्हिडिओंमध्ये काम केलं आहे. दोघांच्या अफेअरच्या चर्चा काही आठवड्यांपासून सुरु होत्या, मात्र आता हार्दिकने स्वतः चं नातं ऑफिशियल केल्याने या चर्चांना पूर्णविराम लागला आहे. हार्दिक पांड्याने आधी अभिनेत्री नताशा स्टेनकोविकशी लग्न केले होते.

# बुलढाणा जिल्हा वार्षिक योजनेचा ५४७.७७ कोटींचा प्रारूप आराखडा सादर

## वाढीव निधीसाठी पाठपुरावा करणार - पालकमंत्री मकरंद जाधव पाटील

जनसंचलन/बुलडाणा

जिल्हा नियोजन समितीच्या सन २०२६-२७ च्या जिल्हा वार्षिक योजनेचा प्रारूप आराखडा आणि सन २०२५-२६ च्या खर्चाचा आढावा आज मदत व पुनर्वसन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री मकरंद जाधव पाटील आणि वस्त्रोद्योग मंत्री तथा सहपालकमंत्री संजय सावकारे यांच्या उपस्थितीत घेण्यात आला. जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात पार पडलेल्या या बैठकीला आमदार चैनसुख संचेती, आमदार सिद्धार्थ खरात, आमदार संजय गायकवाड, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात, पोलीस अधीक्षक निलेश तांबे आणि जिल्हा नियोजन अधिकारी राहुल पवार सर्व खाते प्रमुख यांची उपस्थिती होती. ही बैठक दृकश्राव्य माध्यमातून संपन्न झाली असून यामध्ये पालकमंत्री मकरंद जाधव पाटील, सहपालकमंत्री संजय सावकारे, कामगार मंत्री आकाश फुंडकर आणि आमदार मनोज कायंदे यांनी ऑनलाइन सहभाग नोंदवला. या बैठकीत सन २०२६-२७ च्या जिल्हा वार्षिक योजनेसाठी शासनाने सर्वसाधारण योजनेकरिता ४२९ कोटी १२ लाख रुपयांची कमाल मर्यादा निश्चित केली होती, मात्र जिल्हा यंत्रणांकडून १,१२८ कोटी ५० लाख रुपयांची मागणी करण्यात आली आहे, म्हणजेच ६९९ कोटी ३८ लाख रुपयांची अतिरिक्त मागणी आहे. अनुसूचित जाती उपयोजनेसाठी शासनाने १०० कोटींची मर्यादा निश्चित केली असताना २३६ कोटींची ४७ लाख रुपयाची मागणी करण्यात आली असून यात १३६ कोटींची ४७ लाखाची वाढीव मागणी आहे. तसेच आदिवासी उपयोजनेबाहेरील क्षेत्रासाठी १८ कोटींची ६५ लाख मर्यादा असून ५० कोटींची ४८ लाखाची मागणी करण्यात आली आहे, जी ३१ कोटींनी ८३ लाखांनी जास्त आहे. अशा प्रकारे एकूण ५४७ कोटींच्या ७७ लाख मर्यादेसमोर यंत्रणेने १,४१५ कोटी ४५ लाखाची मागणी केली असून एकूण ८६७ कोटी ६८ लाख रुपयांचा वाढीव निधी मागितला आहे. मंजूर कमाल मर्यादा वाढवून घेण्यासाठी राज्यस्तरावर प्रयत्न करणार असल्याचे पालकमंत्र्यांनी यावेळी सांगितले. सन २०२५-२६ च्या चालू वर्षाचा आढावा घेताना सांगण्यात आले की, सर्वसाधारण योजनेसाठी मंजूर ४९३ कोटींपैकी संपूर्ण निधी प्राप्त झाला असून ४४८ कोटी ३६ लाख प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे, त्यापैकी २३३ कोटी ७७ लाख वितरण झाले आहे. अनुसूचित जाती उपयोजनेसाठी मंजूर १०० कोटींपैकी सर्व निधी प्राप्त असून ९५ कोटींना १५ लाख प्रशासकीय मान्यता व ९२ कोटी ११ लाखांचे वितरण झाले आहे. तसेच आदिवासी उपयोजनेबाहेरील क्षेत्रासाठी मंजूर १९ कोटी ३९ लाखपैकी १५ कोटी ८६ लाखांना प्रशासकीय मान्यता देऊन १२ कोटी ५३ लाख वितरित करण्यात आले आहेत. यावेळी पालकमंत्री मकरंद जाधव पाटील म्हणाले की, वाढीव प्रारूप आराखड्यातून सिंदखेडराजा आणि लोणार सरोवर परिसर विकासाचा विशेष आराखडा तयार करून तो मंजूर केला जाईल. यासाठी भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागासोबतही सविस्तर बैठक घेऊन चर्चा करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील शहरांच्या वाढत्या सीमा लक्षात घेता नगर विकासासाठी अतिरिक्त निधीची मागणी करण्यात येणार असून धार्मिक स्थळांच्या विकासासाठीही वाढीव निधी मागितला जाईल. प्रत्येक गावात स्मशानभूमी, शाळा दुरुस्ती व वर्गखोल्यांच्या दुरुस्ती तसेच शेतकऱ्यांसाठी वाढीव रोहित्र आणि वन पर्यटनासाठी वाढीव निधीची मागणी करण्याच्या पालकमंत्र्यांनी सूचना दिल्या. अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानपोटी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मदत देण्यात आल्याचेही पालकमंत्र्यांनी यावेळी नमूद केले.

# १६ फेब्रुवारी रोजी जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनाचे आयोजन

जनसंचलन/बुलढाणा

महिला व बालविकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचे शासन निर्णय क्र. मलोदि-२०१३/प्र.क्र.११/मकक, दि. ४ मार्च २०१३ अन्वये समस्याग्रस्त व पीडित महिलांच्या प्रश्नांची शासकीय यंत्रणेकडून त्वरित सोडवणूक व्हावी तसेच समाजातील पीडित महिलांना सुलभ मार्गदर्शनाची सुविधा उपलब्ध व्हावी, या उद्देशाने महिला लोकशाही दिन ही प्रभावी उपाययोजना राज्य, विभाग, जिल्हा व तालुका स्तरावर राबविण्यात येत आहे. उपरोक्त शासन निर्णयानुसार दि. १६ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११.०० ते १२.०० या वेळेत मा. निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा यांच्या दालनात जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन आयोजित करण्यात आला आहे. या महिला लोकशाही दिनामध्ये समस्याग्रस्त व पीडित महिलांनी त्यांच्या तक्रारी असल्यास मा. उपजिल्हाधिकारी यांना उद्देशून विहित नमुन्यातील अर्ज द्विप्रतीत सादर करावेत. तक्रार अथवा निवेदन वैयक्तिक स्वरूपाचे असणे आवश्यक असून महिलांनी स्वतः उपस्थित राहणे बंधनकारक आहे. विहित नमुन्यात नसलेले अर्ज, न्यायप्रविष्ट प्रकरणे, सेवा व आस्थापना विषयक बाबी तसेच वैयक्तिक स्वरूपाचे नसलेले तक्रार अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत, असे स्पष्ट करण्यात आले आहे. दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी जिल्हास्तरावर आणि चौथ्या सोमवारी तालुकास्तरावर महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. समस्याग्रस्त व पीडित महिलांचे प्रश्न सोडविण्यासाठी शासनाने हे महत्त्वाचे व्यासपीठ निर्माण केले असून, पीडित महिलांनी महिला लोकशाही दिनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# कुसुम सर्व्हेक्षण व स्पर्श मोहिमेतून व्यापक जनजागृती

जनसंचलन/बुलढाणा

स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान व कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र (कुसुम) विशेष सर्व्हेक्षण मोहीम ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत जिल्ह्यात प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या मोहिमेच्या माध्यमातून कुष्ठरोगाबाबत समाजात व्यापक जनजागृती करण्यात येत असून आजपर्यंत बुलढाणा जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर लोकांपर्यंत संदेश पोहोचविण्यात यश आले आहे. स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियानांतर्गत महिला मंडळे, बचत गट, मानव विकास मिशन शिबिरे, आरोग्य मेळावे, आरोग्य सेवा सत्रे, भजन मंडळे, रांगोळी व निबंध स्पर्धा, कीर्तन, हस्तपत्रिका, म्हणी, शालेय आरोग्य शिक्षण कार्यक्रम, कुष्ठरोग शपथ कार्यक्रम, प्रभात फेरी तसेच वर्तमानपत्रे, फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम यांसह विविध समाज माध्यमांद्वारे जनजागृती उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र (कुसुम) विशेष सर्व्हेक्षण मोहीमही जिल्ह्यात सुरू असून ग्रामीण व शहरी भागातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण व उपजिल्हा रुग्णालये, सामान्य रुग्णालये, नगरपालिका दवाखाने यांच्या कार्यक्षेत्रातील वीटभट्ट्या, चुना भट्ट्या, गिट्टी खदाने, आश्रमशाळा, वसतिगृहे, अनाथाश्रम, वृद्धाश्रम, कारागृहे, बालसुधारगृहे, साखर कारखाने, औद्योगिक वसाहती तसेच भटके व स्थलांतरित नागरिकांची तपासणी करण्यात येत आहे. या सर्व ठिकाणी १७० आरोग्य पथकांच्या माध्यमातून आरोग्य सेवेपासून वंचित राहिलेल्या नागरिकांची कुष्ठरोग विषयक तपासणी केली जात आहे. कुष्ठरोगाची लक्षणे म्हणून फिकट पांढऱ्या किंवा लालसर तांबूस रंगाचे बधिर चट्टे, तेलकट व चकाकणारी त्वचा, भुवयांचे केस विरळ होणे, हात-पायांना मुंग्या येणे व बधिरता, बोटे वाकडी होणे, अंगावर गाठी येणे, मज्जासंस्था बाधित होणे, कानाच्या पाळ्या जाड होणे आदी लक्षणे आढळल्यास तात्काळ जवळच्या आरोग्य केंद्रात तपासणी करून घ्यावी, तसेच तपासणीसाठी येणाऱ्या आरोग्य पथकांना सहकार्य करावे, असे आवाहन आरोग्य सेवा कुष्ठरोग विभाग, बुलढाणा यांनी केले आहे.

# प्रा. डी एस लहाने लिखित माझे बाबा माझी प्रेरणा.. पुस्तकाचे थाटात प्रकाशन

जनसंचलन/बुलढाणा

पुस्तक वाचत असताना वाचकाला उत्कट अनुभूती आली पाहिजे. वाचकाला प्रत्ययानुभूती येणे हा साहित्य निर्मितीचा महत्त्वाचा गुणधर्म असल्याचे बारोमासकार प्रा. सदानंद देशमुख म्हणाले. प्रा. डी एस लहाने लिखित माझे बाबा ..माझी प्रेरणा पुस्तकाचे प्रकाशन प्रसंगी ते बोलत होते.

सहकार व सामाजिक क्षेत्रात कार्यरत प्रा. डी एस लहाने यांनी वडिलांकडून मिळालेली वैचारिक शिदोरी माझे बाबा माझी प्रेरणा या पुस्तकात शब्दबद्ध केली आहे. या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ ५ फेब्रुवारी रोजी शिवसाई कॉम्प्लेक्स, जुना अजिसपूर रोड येथे मान्यवरांच्या हस्ते पार पडला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी डॉक्टर वसंतराव चिंचोले होते. तर ग्रामीण कवी तुळशीराम मापारी, डॉ. कि वा वाघ, प्रा. डी एम कानडजे ,पि डी सपकाळ, सौ दिपाली पाटील, साहित्यिक वैशाली तायडे, पत्रकार राजेंद्र काळे, पत्रकार गणेश निकम ,राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष नरेश शेळके, प्राचार्य शाहिनाताई पठाण, पत्रकार सुरेखा सावळे, प्रतिभा भुतेकर, अनिता कापरे, प्रा. रवींद्र साळवे, प्रा. पारवे ,प्रा. ज्योती पाटील ,सौ मीनाताई लहाने ,एडवोकेट संदीप जाधव, किरण पाटील, दिनकर पांडे आदींची उपस्थिती लाभली. प्रास्ताविक डी एस लहाने यांनी केले. बाबांचं आचरण हाच आपल्यासाठी महत्वाचा संदेश होता असे ते म्हणाले. साधे सरळ जीवन जगण्याची शिकवण बाबानी दिली. त्यांनी दिलेले विचारधन शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न केला असल्याचे पुस्तकाचे लेखक प्रा. डी एस लहाने यांनी सांगून पुस्तक निर्मितीची प्रक्रिया उलगडली. तर होत्याचं नव्हतं झाल्यावरही जो डगमगत नाही तो



बापअशा शब्दात ग्रामीण कवि तुळशीराम मापारी यांनी भावना व्यक्त केल्या. प्रा. डी एस लहाणे यांनी वडिलांच्या आठवणी पुस्तक रूपाने मांडल्यात,हे पुस्तक पुढच्या पिढीला प्रेरणा देणारे ठरेल असे साहित्यिक वैशाली तायडे म्हणाल्या.यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.वसंतराव चिंचोले, नरेश शेळके, कि वा वाघ ,शेळके गुरुजी ,पि डी सपकाळ, प्रा. कानडजे यांनी विचार व्यक्त केले. प्रसंगी मान्यवरांच्या हस्ते पुस्तक लेखन सहाय्य केल्याबद्दल सौ दिपाली पाटील इंगळे यांचा कौटुंबिक विशेष सत्कार करण्यात आला

# छत्रपती संभाजीनगरमध्ये भरधाव कारचा कहर खामगावचा केटरिंग करणारा २३ वर्षीय तरुण ठार!

**जनसंचलन/ छत्रपती संभाजीनगर**

हर्सलजवळील जुना जकात नाक्याजवळ भरधाव कारने उडवलेल्या भीषण अपघातात बुलढाणा जिल्ह्यातील २३ वर्षीय तरुणाचा जागीच मृत्यू झाल्याने संताप व्यक्त होत आहे. चालकाचे नियंत्रण सुटल्याने कार दुभाजकाला धडकली आणि तीन वेळा उलटून थेट पादचारी तरुणांवर कोसळली. सोमवारी (९ फेब्रुवारी) पहाटे दोनच्या सुमारास हा थरारक अपघात घडला. अनिकेत दिलीप निंबाळकर (रा. लांजूळ, ता. खामगाव) असे मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव असून त्याचा मित्र मनोज भिलन गंभीर जखमी झाला आहे. केटरिंगचे काम आटोपून घरी परतताना हा दुर्दैवी प्रसंग ओढवला. मंगेश गोविंदराव कोलते (रा. मयूर पार्क) चालवत असलेली कार अचानक अनियंत्रित होऊन २० ते ३० फूट उडत तरुणांवर आदळल्याने घटनास्थळीच अनिकेतचा जीव गेला.



शिक्षणासाठी संघर्ष करणारा अनिकेत एमएसडब्ल्यूचे शिक्षण घेत होता आणि कुटुंबाला हातभार लावण्यासाठी सुटीच्या दिवशी काम करायचा. या अपघाताने परिसरात हळहळ व्यक्त होत असून निष्काळजी वाहनचालकांवर कठोर कारवाईची मागणी होत आहे. पोलिसांनी कारचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# केनवडजवळ दुर्दैवी अपघात; मोटरसायकल घसरून १९ वर्षीय विद्यार्थ्याचा मृत्यू

**जनसंचलन/केनवड**

केनवडजवळ झालेल्या भीषण अपघाताने परिसर हादरला असून मोटरसायकल घसरल्याने एका १९ वर्षीय होतकरू विद्यार्थ्याचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे, तर त्याचा सहकारी गंभीर जखमी झाला आहे. धोडप बोडखे येथून आमखेडा (ता. मालेगाव) येथील कृषी महाविद्यालयाकडे जात असताना हा अपघात घडला. या दुर्घटनेत संचित प्रल्हाद बकाल (वय १९) हा गंभीर जखमी झाला होता. त्याच्यावर मेहकर येथील रुग्णालयात उपचार सुरू असताना त्याने अखेरचा श्वास घेतला. अपघातात जखमी झालेल्या त्याच्या सहकाऱ्यावर उपचार सुरू असून त्याची प्रकृती सध्या स्थिर असल्याची माहिती



वैद्यकीय सूत्रांनी दिली आहे. संचित हा एकुलता एक मुलगा होता. तो केनवड येथील माजी तंटामुक्ती अध्यक्ष रवी खराटे व विमा प्रतिनिधी विनोद खराटे यांचा भाचा असल्याने नातेवाईकांमध्ये शोककळा पसरली आहे. अवघ्या १९ व्या वर्षी एका होतकरू विद्यार्थ्याचा अपघाती मृत्यू झाल्याने धोडप बोडखे व केनवड परिसरात हळहळ व्यक्त होत असून रस्ते सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे

# मलकापूर कृषी पर्यवेक्षक एसीबी च्या जाळ्यात; ४ हजारांची लाच घेताना रंगेहात पकडला!

**जनसंचलन/बुलढाणा**



शेतकऱ्यांच्या अनुदानावर डल्ला मारणाऱ्या भ्रष्ट अधिकाऱ्यांवर अँन्टी करप्शन ब्युरोने पुन्हा एकदा मोठी कारवाई करत मलकापूर तालुका कृषी अधिकारी कार्यालयातील कृषी पर्यवेक्षक ईश्वर भागवत सावकारे यांना ४ हजार रुपयांची लाच घेताना रंगेहात पकडले. कृषी यांत्रिकीकरण उपअभियानांतर्गत मळणीयंत्र खरेदी करून अनुदानाची प्रक्रिया पूर्ण केल्याच्या मोबदल्यात सावकारे यांनी सुरुवातीला ५ हजार रुपयांची मागणी केली होती. तक्रारदार शेतकऱ्याने कडे धाव घेतल्यानंतर पडताळणी करून सापळा रचण्यात आला. दि.९ फेब्रुवारी रोजी मलकापूर-बोदवड रोडवरील पिंपळगावदेवी फाट्याजवळ राधास्वामी सत्संग परिसरात ही कारवाई करण्यात आली. पंचासमक्ष लाच स्वीकारताना आरोपीला पकडण्यात आले असून भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. या घटनेमुळे कृषी विभागातील भ्रष्टाचार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला असून शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. ने लाच मागणीबाबत तक्रार करण्याचे आवाहन नागरिकांना केले आहे.

# खामगावजालना रोड अपघात झोन ठरतोय का? आजच्या धडकेत चौघे जखमी




**जनसंचलन/ चिखली**

खामगाव-जालना महामार्गावर मीरा हॉटेलसमोर आज रात्री साडेसातच्या सुमारास दोन दुचाकींची जोरदार धडक होऊन चार जण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली. या अपघातात गोपाल सोळंकी (वय १४), साहेबराव सोळंकी (वय ७०), सखाराम सोळंकी (वय ७०, सर्व रा. कोलारा ता. चिखली) तसेच विकास भानुदास मोरे (वय २५, रा. अंत्री खेडेकर ता. चिखली) हे गंभीर जखमी झाले आहेत. अपघाताची माहिती मिळताच स्थानिकांनी तातडीने धाव घेत जखमींना जवंजाळ हॉस्पिटल येथे उपचारासाठी दाखल केले. सध्या त्यांच्यावर उपचार सुरू असून काहींची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, खामगाव-जालना महामार्ग चिखली शहरातून जात असतानाही मेहकर फाटा ते चिखली दरम्यान एकही गतीरोधक नसल्याने वाहनांचा वेग प्रचंड वाढतो आणि वारंवार अपघात घडत आहेत. नागरिकांनी प्रशासनावर तीव्र नाराजी व्यक्त करत तातडीने गतीरोधक व सुरक्षात्मक उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. प्रशासन जागे होणार की आणखी बळी जाणार, असा संतप्त सवालही स्थानिकांकडून उपस्थित केला जात आहे.

# शारदा ज्ञानपीठच्या विद्यार्थ्यांनी वृद्धांसाठी उभारली लाखोंची मदत

**जनसंचलन/बुलढाणा**

सामाजिक जाणीव आणि संवेदनशीलतेचा उत्कृष्ट नमुना दाखवत बुलढाणा येथील शारदा ज्ञानपीठ विद्यालयातील इयत्ता तिसरी ते सहावीच्या विद्यार्थ्यांनी या संस्थेसाठी तब्बल १ लाख ६ हजार ६३८ रुपयांची मदत जमा करून आदर्श निर्माण केला आहे. लहान वयातच समाजाप्रती असलेली जबाबदारी ओळखत विद्यार्थ्यांनी उत्साहाने या उपक्रमात सहभाग नोंदवलाया उपक्रमात नववी माळी हिने १३०० रुपये, पार्थ बाबूर याने ११६१ रुपये, तर गौरी मयुरे हिने ११११ रुपयांचे विशेष योगदान देत सर्वांचे लक्ष वेधले. विद्यार्थ्यांच्या या कार्याचे शाळेच्या प्रशासकीय जगताप मॅडम, मुख्याध्यापिका अंतरकर मॅडम, उपमुख्याध्यापक दीपक देशपांडे सर तसेच बासिद सर व गिरीष चौधरी सर यांनी मनापासून कौतुक केले. भविष्यातही अशा सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय राहण्याचे मार्गदर्शन त्यांनी विद्यार्थ्यांना दिले. विद्यार्थ्यांच्या या एकत्रित प्रयत्नातून गरजू वृद्धांना मदत



होणार असून समाजात सकारात्मक संदेश पोहोचणार आहे. शिक्षक व पालकांनीही या उपक्रमाचे स्वागत केले असून शारदा ज्ञानपीठच्या विद्यार्थ्यांचा हा आदर्श इतरांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====

संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८